# पिंपरी –चिंचवड सहकारी बँक मर्यादित, पिंपरी

**"दृष्टीकोन विकासाचा व समाजसेवेचा"**

मुख्य कार्यालय : शामा आर्केड, स. न. १११ मेन रोड, काळेवाडी, पिंपरी पुणे ४११०१७
फोन न. ७२७६०९६४३१ / ४३४ इमेल: admin@pcsbank.in

## वार्षिक सर्वसाधारण सभा सुचना

**(फक्त सभासदांकरिता)**

या बँकेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक २९ सप्टेंबर २०२२ या दिवशी सकाळी ठिक ११.०० वा. आचार्य अत्रे सभागृह, स.तु.नगर,(वाय.सी.एम.हॉस्पिटल जवळ) पिंपरी पुणे ४११०१८ या ठिकाणी बँकेचे माननीय अध्यक्ष श्री. श्रीमंत बाबुराव शितोळे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सदर सभेस आपण प्रत्यक्ष उपस्थित रहावे, हि विनंती.

## सभेपुढील विषय

१) मागील दिनांक २९ संप्टेंबर २०२१ या दिवशी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
२) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे व वैधानिक लेखा परिक्षकांनी मान्यता दिलेल्या दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरचा ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१-२२ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
४) सन २०२२-२३ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व सन २०२१-२०२२ या वर्षात केलेल्या अंदाजा पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५) वैधानिक लेखापरिक्षण सन २०२१-२२ अहवालाची नोंद घेणे व सन २०२०-२१ च्या दोष दुरुस्ती अहवालासस्विकृती देणे.
६) मा. संचालक मंडळाने सन २०२२-२३ करिता शिफारस केलेल्या व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने मंजूरी दिलेल्या शासन मान्य नाम तालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व शासन नियमानुसार मेहनताना देणेबाबत मंजूरी देणे.
७) आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता अंतर्गत व कर लेखापरीक्षकांच्या नेमणुकीचे व त्यांचा मेहनताना ठरवण्याचे अधिकार मा .संचालक मंडळ सभेस देणेबाबत निर्णय घेणे.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) नुसार) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात संचालक मंडळ सदस्य व त्यांचे कुटुंबियांना दिलेल्या कर्जाची माहिती वाचून नोंद घेणे.
९) सन २०२१ – २२ या कालावधीत शासनमान्य एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत व व्याजातील सूट देऊन बंद केलेल्या खात्यांबाबत संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.
१०) बँक सेवक आकृतिबंध (Staffing Pattern) मंजुरी देणे.
११) बँकेने तयार केलेले सेवानियम मा. सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मंजुरीस पाठविणे बाबत निर्णय घेणे.
१२) बँकेच्या सन २०२१-२२ ते २०२६-२७ या कालावधीचे संचालक मंडळ निवडणूकी संदर्भात सद्यस्थिती बाबत माहिती देणे
१३) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐन वेळच्या विषयांचा विचार करणे.

सभेस सर्व माननीय सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

मा. संचालक मंडळाचे सुचनेवरून
धनंजय मुरलीधर पाटील
(प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी)

स्थळ : पिंपरी
दिनांक **: ०९.०९.२०२२**

## * विशेष सुचना *

१. बँकेच्या पोटनियमाप्रमाणे सभेसाठी आवश्यक असणा-या गणसंखेच्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरमचे) बंधन असणार नाही.

२. ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. २५ सप्टेंबर २०२२ पर्यंत, मुख्य कार्यालय अथवा शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात अर्ज द्यावेत व अर्जामध्ये सभासद क्रमांक व संपुर्ण नाव नमूद करून पाठवावेत. सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.

३. वार्षिक सर्वसाधारण सभेची सविस्तर नोटीस व दि. ३१ मार्च २०२२ अखेर बँकेचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व बँकेची वेबसाईट www.pcsbank.in वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली आहे.

४. सभासदांनी आपल्या पत्त्यात बदल झाला असलेस तसेच संपर्क दूरध्वनी अथवा मोबाईल क्रमांक तसेच केवायसी कागदपत्रे याची अद्ययावत माहिती बँकेस द्यावी. आपले भाग दाखले घेऊन जावेत. तसेच सर्व सभासद खातेदारांनी आपली केवायसी पूर्तता करून घ्यावी.

५. सन्माननीय सभासदांनी सभेस येताना कृपया आपला फोटो ओळखपत्राचा पुरावा (आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र/बँक पासबुक/शासकीय ओळखपत्र) सोबत आणावे. त्याशिवाय सभेत प्रवेश दिला जाणार नाही

६. ज्या सभासदांचे पाल्य इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेत ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी आपल्या पाल्याची गुणपत्रिका बँकेच्या मुख्य कार्यालय किंवा नजीकच्या शाखा कार्यालयात दिनांक २५/०९/२०२२ पर्यंत पहोच करावी सभा स्थळी विध्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येईल.

७. सभासदांनी भाग भांडवलामध्ये रक्कम गुंतवणूक करुन बँक सदृढ करण्यास मदत करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.